# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०००००८

दूरध्वनी - २३०७५५३९/२३०२ ३९०० e-mail : pro@msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२


---

## प्रसिध्दी पत्रक - २८

## ठाणे-पुणे- ठाणे मार्गावर किंगलॉंग ऐवजी व्होल्वो वातानुकूलित सेवा

**मुंबई, बुधवार, दि. १९ मे, २०१०**

शनिवार, दि. १५ मे रोजी रात्रौ ८.४५ वा. रा.प.महामंडळाच्या पुणे - ठाणे मार्गावरील वातानुकूलित किंगलॉंग बसला ऐरोली पूलावर अचानक लागलेल्या आगीत सदर बस पूर्ण जळाली परंतु प्रवाशांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे कोणतीही जिवितहानी झाली नाही. **सदर दुर्घटनेची गंभीर दखल घेऊन रा.प.महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्याच्या दृष्टीने एस.टी.च्या ताफ्यातील सर्व किंगलॉंग बसेस सोमवार दि. १७ मे पासून बंद करून त्याजागी १५ नवीन निमआराम बसेसची व्यवस्था केली आहे.**

ठाणे - पुणे मार्गावर दररोज दोन्ही बाजूने प्रत्येकी २० वातानुकूलित फेऱ्या चालविण्यात येत होत्या. वरील निर्णयामुळे सदर मार्गावरील वातानुकूलित फेऱ्यात कपात होऊन **सध्या २० पैकी १० फेऱ्यांसाठी वातानुकूलित व्होल्वो बसेसची व उर्वरीत फेऱ्यांसाठी नवीन निमआराम बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, दादर - पुणे - दादर (पिंपरी-चिंचवड मार्गे) मार्गावरील ४ किंगलॉंग बसेसच्या जागी नवीन निमआराम बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.**

उपरोक्त व्यवस्थेमुळे प्रवाशांना होणाऱ्या त्रासाबदद्ल रा.प.महामंडळ अत्यंत दिलगीर असून संबंधित मार्गावर बाधित झालेली वातानुकूलित सेवा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु असून प्रवाशांनी कृपया, सहकार्य करावे अशी विनंती करण्यात येत आहे.

**सहा.जनसंपर्क अधिकारी**

## MAHARASHTRA STATE ROAD TRANSPORT CORPORATION

Central Office, Maharashtra Vahatuk Bhavan, Dr Anandrao Nair Marg, Mumbai Central, Mumbai 400 008

Tel : 23075539/23023900 E-mail : pro@msrtc.gov.in Fax : 23086352


=========================================================

# PRESS NOTE - 28

## MSRTC replace Kinglong with Volvo on Thane-Pune route

**Mumbai,Wednesday, May 19, 2010**

Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC)'s Kinglong A/C bus plying on Pune - Thane route caught fire on Airoli bridge on Saturday, May 15. Luckily, all the passengers and crew members escaped unhurt but the bus was completely gutted. **Following this serious incident and considering the safety of passengers, Mr Deepak Kapoor, Vice Chairman & Managing Director of MSRTC has ordered the immediate withdrawal of the entire fleet of Kinglong buses from Monday. These buses were replaced by 15 new brand semi luxury buses. Besides, three Volvo buses have also been introduced on this route.**

Earlier, MSRTC was plying 20 A/C trips between Thane & Pune from both points and with the introduction of three Volvos, **10 out of 20 trips are operated with A/C Volvo buses** and the rest are being operated with brand new semi-luxury buses. Four Kinglong buses on Dadar - Pune (via Pimpri-Chinchwad) route have also been replaced with semi-luxury buses.

MSRTC is making all efforts to restore the A/C trips on these routes and regrets the inconvenience caused to passengers.

**Asst Public Relations Officer**